प्रेस नोट
दिनांक २८/१०/२०२६

पोलीस उप आयुक्त, मध्य परिमंडळ ०२, मुंबई
ॲन्टॉपहिल पोलीस ठाणे,

ॲन्टॉपहिल पोलीस ठाणे, मुंबई यांच्याकडुन
आत्महत्येचा प्रयत्न करत असलेल्या २१ वर्षीय युवकाचा जिव वाचविलेबाबत...

दिनांक २५/१०/२०२६ रोजी २०:१० च्या सुमारास ॲन्टॉपहिल पोलीस ठाण्यास माहिती मिळाली की, बंगाली पुरा येथील एका इमारतीच्या गच्चीवर एक मुलगा उभा असून तो जीव देण्याचा प्रयत्न करत आहे. सदर माहिती मिळताच तात्काळ पोलीस निरीक्षक अर्चना पाटील, पोलीस हवालदार अमित खंदारे, पोलीस हवालदार भानुदास चव्हाण, पोलीस हवालदार निकम असे घटनास्थळावर रवाना झाले. सदर ठिकाणी एक २१ वर्षीय युवक हा एका इमारतीच्या नवव्या माळ्याच्या गच्चीच्या टोकावर उभा होता व आत्महत्येचा प्रयत्न करीत होता. सदर ठिकाणी तात्काळ पोहचलेल्या पोलीस पथकाने माहिती घेतली असता नमुद मुलगा हा त्याचे आई-वडीलाशी भांडण झाल्याने नैराशेतून आत्महत्या करण्यासाठी गेला होता.

परंतु पोलिसांनी त्याचे मन परिवर्तन करून त्याला गच्चीच्या कठड्यावरून अत्यंत शिताफीने व कौशल्य पूर्ण रितीने खाली उतरविले व ताब्यात घेतले त्यानंतर सदर मुलास व त्याच्या आई-वडिलांस समजावून सांगण्यात आले असून आत्महत्या करण्यास गेलेल्या २१ वर्षीय युवकाचा जीव पोलीसांनी वाचवलेला आहे.

सदरची उल्लेखनीय कामगिरी ही मा. पोलीस आयुक्त, श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त कायदा व सुव्यवस्था, श्री. मनोज कुमार शर्मा, मा. अप्पर पोलीस आयुक्त, मध्य प्रादेशिक विभाग, श्री विक्रम देशमाने, पोलीस उप आयुक्त मध्य परिमंडळ ०२ माटुंगा, मुंबई, श्री अनुराग जैन, सहायक पोलीस आयुक्त, सायन विभाग, श्री. महेंद्र मोरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, ॲन्टॉपहिल पोलीस ठाणे, श्री. शिवाजी पावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अर्चना पाटील, पोलीस हवालदार अमित खंदारे, पोलीस हवालदार भानुदास चव्हाण, पोलीस हवालदार निकम यांनी प्रत्यक्ष कारवाई केली आहे.

***

Scanned with CamScanner